**L. A. BILL No. XXXV OF 2022.**

A BILL

TO AMEND THE REGULARISATION OF UNAUTHORISED DEVELOPMENTS IN THE CITY OF ULHASNAGAR ACT, 2006.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५.**

**उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे अधिनियम, २००६ यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

२००६ चा महा. ९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे अधिनियम, २००६ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

एचबी-११३६-१

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे अधिनियम, २००६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (३) मधील, खंड (क) मधील,- २००६ चा महा. ९.

(१) "पुढील तक्त्यानुसार निर्धारित केलेली" या मजकुराऐवजी, "विहित करण्यात येईल अशी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) फीचा तक्ता वगळण्यात येईल.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (३) मधील, खंड (क) च्या परंतुकामधील, "४.०० हून अधिक तलपृष्ठ निर्देशांक (F.S.I.)" या मजकुराऐवजी, "उल्हासनगर शहर महानगरपालिकेला लागू असलेल्या महाराष्ट्रासाठी मंजूर केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तलपृष्ठ निर्देशांक (F.S.I.) पेक्षा अधिक तलपृष्ठ निर्देशांक (F.S.I.)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५.]**

**[ उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे अधिनियम, २००६ यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[**श्री. एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.]

**(विधानसभेने दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.